वित्त विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर,
नविन प्रशासकिय इमारत, नागाळा पार्क, कोल्हापूर
दुरध्वनी -(0231) 2656723,Email - cafokop@gmail.com

जा.क्र.जिपको/वित्त/संकलन/अर्थसंकल्प-2 /2018

दिनांक - 03-02-2018

विषय :- जिल्हा परिषद स्वनिधी व पंचायत समिती सेस अंदाजपत्रक मध्ये योजना सुचविण्यासाठी आपणस आवाहन करणेबाबत-------

सस्नेह नमस्कार,

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही जिल्हा परिषद स्वनिधी व पंचायत समिती सेस अंदाजपत्रक तयार करण्याची प्रक्रिया अर्थ समिती व वित्त विभागामार्फत सुरु आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांनी ग्रामीण विकासात लक्षणीय कामगिरी केली आहे. या आराखडयाची पहिली पायरी म्हणजे अंदाजपत्रक होय. या अंदाजपत्रकात जिल्हयाच्या सर्वस्तरातील लोकसमुहाच्या विचारांचे, सामाजिक आवश्यकता व निकड आणि लोकभावनांचे प्रतिबींब असावे.तसेच ख-या अर्थाने हे अंदाजपत्रक बहुचर्चेने तयार व्हावे असा आमचा मानस आहे. आपले राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रातिल मान्यता व योगदान लक्षात घेता, विविध योजना व अंदाजपत्रक आराखडयासाठी आपली मते व विचार आमच्यासाठी बहुमोल आहेत.

तरी आपल्या सुचना व विचार कृपया दि.14/02/2018 पर्यंत लेखी स्वरुपात वित्त विभागाकडे देवुन जिल्हयाच्या सर्वंकष ग्रामिण विकासात सहभाग नोंदवावा हि विनंती.(आपले सुलभ संर्दभासाठी सोबतच्या पत्रकाचे अवलोकन व्हावे.)

आपले सहकार्याच्या प्रतिक्षेत !!!

आपला स्नेहांकित

(अंबरिषसिंह घाटगे)
सभापती
अर्थ व शिक्षण समिती
जिल्हा परिषद कोल्हापूर

(संजय राजमाने)
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
जिल्हा परिषद कोल्हापूर

प्रत :- माहितीसाठी सविनय सादर.

1. मा. अध्यक्षा, जिल्हा परिषद कोल्हापूर
2. मा. उपाध्यक्ष, जिल्हा परिषद कोल्हापूर

जिल्हा परिषद स्वनिधी व पंचायत समिती सेस मध्ये योजना सुचविण्यासाठी विविध सहभागधारकांना आवाहन

## सहभागधारकांना आवाहन

## सन 2018-19

---

भारत सरकार, महाराष्ट्र शासनाकडील विविध विभागाच्या महत्वाकांक्षी योजना, वित्त आयोग, जिल्हा परिषदेच्या, पंचायत समितीच्या जन कल्याणकारी व नाविन्यपूर्ण योजनांतर्गत विविध प्रकारचे लाभार्थी व सहभागधारक आहेत. ग्रामपंचायती, ग्रामपंचायतीअंतर्गत वैयक्तिक लाभार्थी, महिला, किशोरवयीन मुली, गरोदर महिला, माता, नवजात बालक, शाळा कॉलेजमधील मुले - मुली, रस्ते, शेतकरी, जनावरे, इत्यादींचा सर्वांगिण ग्रामीण विकास व्हावा व आंतरराष्ट्रीय स्तरावर सन 2015-2030 या कालावधीत साध्य करावयाची शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य होण्यास्तव जिल्हा परिषदेमार्फत खालीलप्रमाणे विविध योजना राबविण्यात येतात.

कृषी विभागांतर्गत शेतकऱ्यांना कडबा कुट्टी, बायोगॅस संयत्र, ताडपत्री, खते, पिक संरक्षण आयुधे, औजारे पुरविणे इ., पशुसंवर्धन विभागांतर्गत महिलांना शेळी व तलंगा गट वाटप, पशु दवाखान्यांना औषधे पुरवठा, जनावरांचे वंध्यत्व निवारण, देशी गाई संगोपन, प्लास्टिकच्या किटल्या इ. पुरविणे, समाज कल्याण विभागांतर्गत महिलांना व्यक्तिना स्वयंरोजगारासाठी दळप यंत्र, कांडप यंत्र, शेवया मशिन, पत्रावळी मशिन, मागासवर्गीय वस्तीच्या विकासासाठी सुधारणा करणे, समाज मंदीर दुरूस्ती व बांधकाम इ., अपंग कल्याण विभागांतर्गत अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी साधने व उपकरणे पुरविणे, महिला बाल कल्याण विभागांतर्गत महिलांना व्यवसायाच्या दृष्टीने तांत्रिक, कायदेविषयक प्रशिक्षण, संगणक प्रशिक्षण, अंगणवाड्यांना साहित्य पुरविणे, महिलांना स्वयंरोजगारासाठी पिठाची गिरण, पिको फॉल मशिन, सोलर कुकर, सौर कंदील, मुलींना सायकली पुरविणे, आरोग्य विभागांतर्गत गरोदर मातांना औषधोपचार, साथी प्रतिबंधक औषध, ज्येष्ठ नागरीकांची वैद्यकीय तपासणी, लेक वाचवासाठी दांपत्यांना व ग्रामपंचायतींना प्रोत्साहन पुरस्कार अनुदान देणे, शिक्षण विभागांतर्गत प्राथमिक शाळा डिजिटायझेशन करणे, शाळा बांधकाम, शिष्यवृत्ती देणे, आदर्श शाळा पुरस्कार, ग्रामपंचायत विभागांतर्गत बारा बलुतेदारांना व्यवसायासाठी साहित्य पुरविणे, शवदाहिनी पुरविणे, आदर्श ग्रामपंचायतीस पुरस्कार, बांधकाम विभागांतर्गत रस्ते बांधकाम, प्रशासकीय इमारत देखभाल व दुरूस्ती, कर भरणे, निवासस्थाने, विश्रामगृहे देखभाल व दुरूस्ती, नावा पुरविणे, ग्रामीण पाणी पुरवठा विभागांतर्गत पाणी टंचाईग्रस्त गावांमध्ये पाणी पुर्नभरण करणे, डोंगराळ भागात पाणी वितरणाची व्यवस्था करणे, रेन वॉटर हार्वेस्टिंग करणे इत्यादी सर्व विभागांतर्गत विविध योजना स्वनिधीमधुन राबविण्यात येतात.

जिल्हा परिषदस्तरावर विविध विभागांतर्गत निर्वाचित जिल्हा परिषद सदस्यांमधुन विषय समिती गठीत करण्यात आली आहे. सदर विषय समितीमार्फत लाभार्थी निवड होऊन लाभार्थ्यांना

लाभ देण्यात येतो. सदर लाभार्थी निवड करताना निकड, गरज, वास्तविकतेतील गरजु लाभार्थी यांचे प्रस्ताव ग्रामपंचायत व पंचायत समितीमधुन प्राप्त झाल्यानंतर जिल्हास्तरावर निवड केली जाते. रस्त्यांच्या बाबतीत स्थानिक मागणी व आवश्यकतेप्रमाणे उपलब्ध निधीतुन रस्त्यांची कामे करण्यात येतात. सर्व योजनांतर्गत लाभार्थ्याला लाभ दिल्यानंतर त्या लाभार्थ्यांचे रोजगार स्वयंरोजगार व आर्थिक, सामाजिक जीवनमान किती उंचावले याची माहिती उपलब्ध होणे महत्वाचे आहे. विकास योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे योजनांची यशस्वी गाथा (Success Stories) ह्या जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर संग्रहीत करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

ग्रामपंचायती, जिल्हा परिषदेचे रस्ते, ग्रामीण मार्ग, जिल्हा मार्ग, इतर मार्ग रस्ते हे आमदार निधी, डोंगरी विकास कार्यक्रम, ग्रामीण रस्ते मजबुतीकरण योजना, प्रधान मंत्री ग्राम सडक योजना या विविध योजनांतर्गत रस्त्यांची कामे करण्यात येतात. केंद्र शासनाने सर्व ग्रामपंचायतींना जो सांकेतांक क्रमांक दिलेला आहे त्या सांकेतांक क्रमांकाबरोबरच प्रत्येक जिल्हा, ग्राम मार्गाला सांकेतांक क्रमांक (कोडीफिकेशन) देण्यात येईल. पाणी पुरवठा योजनांच्या सर्व माहितीचे उदा. हातपंप, विद्युतपंप, ग्रामीण पाणी पुरवठ्याचे शाश्वत स्त्रोत व स्वच्छ पाणी पुरविण्यासाठी केलेल्या उपक्रमाची नोंदणी (कोडीफिकेशन) करण्यात येईल. त्याच प्रमाणे शेतकरी, विद्यार्थी, गरोदर माता, यांना आधार कार्डला जोडुन लाभ देण्यात येतील. जेणेकरून योग्य त्या लाभार्थ्याला लाभ मिळेल व गरजु लाभार्थी लाभापासुन वंचीत राहणार नाही. जनावरांच्या बाबतीतही जनावरांची पशुधन मोजणीद्वारे गावनिहाय सांकेतिक करून पशुधनाला योग्य ते लाभ देण्यात येतील. जेणे करून कोणत्या ग्रामपंचायती अंतर्गत कोणत्या लाभार्थ्याला कोणकोणते लाभ दिले आहेत व यामुळे त्याचे जीवनमान किती उंचावले आहे हे शासनास किंवा योजना राबविणाऱ्या विभागांना त्या योजनांची फलश्रुती कळेल. लाभार्थ्यांच्या गरज, आवश्यकता, निकडीनुसार विविध योजना विकसीत करण्यासाठी याचा उपयोग होईल.

यासाठी जिल्हा परिषदेच्या स्वनिधीमधुन कोणत्या योजना घ्याव्यात याबाबत ग्रामपंचायत व पंचायत समिती स्तरावर सर्व लाभार्थी, महिला, मुली गरोदर व स्तनदा माता, नवजात बालक, शाळा-महाविद्यालयीन मुले व मुली, शेतकरी, समाज कल्याण व अपंग कल्याणासाठी योजना, पिण्याचे पाणी व स्वच्छता, शेती, पशुसंवर्धन व मत्स्य व्यवसाय इत्यादींसाठी ग्रामीण स्तरावरून योजना सुचवून जिल्हा परिषद स्वनिधी व पंचायत समिती सेस मधुन ग्रामीण जनतेचा सर्वांगिण विकास साधण्यासाठी नाविन्यपूर्ण योजना सुचवाव्यात असे आवाहन करण्यात येत आहे.

**सर्वांगीण विकास हाच आमचा ध्यास !!!**

| संजय राजमाने<br>मुख्य लेखा व वित्त अधिकारी<br>जिल्हा परिषद कोल्हापूर | डॉ. कुणाल खेमनार, भाप्रसे<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद कोल्हापूर | अंबरिषसिंह घाटगे<br>सभापती, अर्थ व शिक्षण समिती<br>जिल्हा परिषद कोल्हापूर | शौमिका महाडिक<br>अध्यक्षा<br>जिल्हा परिषद कोल्हापूर |
|---|---|---|---|

H:\Stakeholder.docx